करण्याचा संकल्प करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचे मोठे उद्दिष्ट प्रमुख यांनी सहभाग नोंदविला. एम.एम.गज, एस.डी.पुरी आदी उपस्थित होते.

**सायबर सुरक्षितता** नगर सायबर वॉरियर्सचा निर्धार, नगर महाविद्यालयात प्रशिक्षण सत्र उत्साहात

# शाळा-कॉलेजमध्ये पोहोचणार सायबर सुरक्षेचे तंत्र

प्रतिनिधी | अहिल्यानगर

सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत नगर महाविद्यालयातील संगणक विभागाच्या सहकार्याने नगर सायबर वॉरियर्सच्या २० स्वयंसेवकांसाठी विशेष प्रशिक्षण सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश स्वयंसेवकांना सायबर जनजागृती, व्यावसायिक कौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, नेतृत्व क्षमता आणि त्यांच्या अंगी असलेल्या गुणांची ओळख करून देत भविष्यातील जबाबदाऱ्यांसाठी सक्षम बनविणे हा होता. या प्रशिक्षणासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अभिजीत कुलकर्णी, उपप्राचार्य डॉ. दिलीप भालसिंग, उपप्राचार्य विलास नाबडे, संगणक विभागाचे विभागप्रमुख रज्जाक तसेच रोजगार समन्वयक निवेदिता काळे यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. या प्रशिक्षण सत्रात प्रशिक्षित झालेले नगर सायबर वॉरियर्सचे हे २० स्वयंसेवक भविष्यात विविध सायबर जनजागृती उपक्रमांमध्ये सहभाग घेणार आहेत. यप्रसंगी क्विक हील फाउंडेशनतर्फे दीपू सिंह यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी केवळ सायबर सुरक्षेचे तांत्रिक प्रशिक्षणच दिले नाही तर प्रत्येक स्वयंसेवकामधील वेगवेगळे गुण, कौशल्ये आणि नेतृत्व क्षमता ओळखण्यासाठीही विशेष प्रयत्न केले. संवादात्मक उपक्रम, गटचर्चा आणि प्रत्यक्ष उदाहरणांच्या माध्यमातून त्यांनी स्वयंसेवकांना स्वतःच्या क्षमतांची जाणीव करून देत त्यांचा प्रभावी विकास करण्यासाठी प्रेरित केले.

प्रशिक्षणामध्ये सहभागी झालेल्या २० स्वयंसेवकांनी उत्साहाने व शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान त्यांनी सायबर सुरक्षेशी संबंधित विविध संकल्पना, प्रभावी संवाद कौशल्य, सांघिक कार्यपद्धती, नेतृत्वगुण आणि सामाजिक जबाबदारी यांसारख्या महत्त्वपूर्ण गोष्टी आत्मसात केल्या. या प्रशिक्षणाच्या यशस्वी आयोजनाबद्दल नगर सायबर वॉरियर्सतर्फे सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे तसेच क्विक हील फाउंडेशनचे आभार मानले.



नगर महाविद्यालयात आयोजित प्रशिक्षण सत्रासाठी उपस्थित असलेले विद्यार्थी.

## नगर सायबर वारियर्स करणार जनजागृती

सायबर सुरक्षेबाबत समाजामध्ये जनजागृती निर्माण करण्यासाठी आणि प्रशिक्षित स्वयंसेवकांची प्रभावी फळी तयार करण्याच्या दृष्टीने हे प्रशिक्षण महत्त्वपूर्ण ठरले असून आगामी काळात नगर सायबर वॉरियर्स विविध शैक्षणिक संस्था व सामाजिक पातळीवर सायबर सुरक्षा जनजागृती अभियान अधिक व्यापकपणे राबविणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.